# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

## Pune metropolitan Regional Development Authority,Pune

पुणे महानगर

स.नं. १५२ – १५३, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध, पुणे – ४११०६७

S.No. 152-153, Maharaja Sayajirao Gaikwad Udyog Bhawan, Aundh, Pune – 411 067

Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email: hqpmrda@gmail.com


---

## जमीन उपविभागणी / रेखांकन विकास परवानगी

**जा.क्र.: DP/बीएचए/मौ.पेठ/ ग.नं. २, ३, ४, ८, ९, १०, ११, ३३९ पै.,/प्र.क्र.११८३/१७-१८, दि.१७ /१०/२०१८**

**प्रति,**

श्री. दत्ताराम गोविंद कैसरे व इतर-७

पत्ता:- ४, गोविंद, अलकानंदा गृहरचना सहकारी सोसायटी, पुणे- ०९

मौजे-पेठ, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे येथील ग.नं.२, ३, ४, ८, ९, १०, ११, ३३९ पै., क्षेत्र-९८,६००.०० चौ.मी. मधील जमीन उपविभागणी/रेखांकन मंजूरीचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे प्राप्त झाला आहे. आपण प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रास अधिन राहून तसेच सोबतच्या परिशिष्ट ' क ' मध्ये नमूद अटी व शर्तीस अधिन राहून उक्त जमीन उपविभागणी/रेखांकनास तात्पुरती मंजूरी देण्यात येत आहे.

मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने

**महानगर आयुक्त,**
**तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**पुणे यांचे करिता**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे
पु म प्र वि प्रा

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि-२७ /१०/२०१८ रोजीचे पत्र क्र. ११८३/१७-१८ सोबतचे**

## परिशिष्ट 'क'

१) मंजूर रेखांकनाचे अनुषंगाने महसूल विभागाकडून अकृषिक परवानगी घेणे बंधनकारक आहे.

२) जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील पत्र क्र. PRH/PMRDA/NA/SR/१५४/२०१७, दि-१५/०१/२०१८ या पत्रातील जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, अकृषिक आकारणी आणि ती वरील भार याबाबत पत्र यामधील अटीं व शर्ती अर्जदार / विकासक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील

३) भूमि अभिलेख खात्याकडून जागेवर तात्पुरती मंजूरी दिलेल्या जमीन उपविभागणी / रेखांकनानुसार हद्दी कायम करुन त्या मोजणीची नक्कल अंतिम मंजूरीसाठी प्राधिकरणाकडे दाखल करणे बंधनकारक आहे.

४) जमीन उपविभागणी /रेखांकनाचा विकास करताना रस्ते तयार करणे, मलनिस्सारण व्यवस्था, पाण्याची व्यवस्था, पथदिवे लावणे इ. कामे करणे ही विकासक यांची जबाबदारी असून या बाबींचा जागेवर विकास झालेनंतर प्राधिकरणास हस्तांतरीत करणे बंधनकारक आहे.

५) ज्या जागेची मालकी / वहीवाट, अर्जदार/विकासक/जमीन मालक यांची नाही अशा कोणत्याही जमिनीवर सदर परवानगीद्वारे विकास अनुज्ञेय राहणार नाही.

६) सदर उपविभागणी / रेखांकनास प्राधिकरणाची अंतीम मंजूरी मिळालेशिवाय या रेखांकनातील भूखंडामध्ये बांधकाम परवानगी अनुज्ञेय होणार नाही. तसेच रेखांकनातर्गतच्या भूखंडाची विक्री करता येणार नाही.

७) तात्पुरती मंजूरी दिलेल्या रेखांकनानुसारच्या खुल्या जागेचे तसेच सुविधा भूखंडाचे क्षेत्र कोणत्याही परिस्थितीत कमी भरता कामा नये.

मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने

**महानगर आयुक्त,**
**तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**पुणे यांचे करिता**